म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा. वा
दा. क्र. ३०२०
BVBK-0403020

# लिव्हरच्या गोष्टी

— रमेश मुधोळकर

ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
वा. वा.
3020



BVBK-0403020

३०३०
२अ७०१

# गलिव्हरच्या गोष्टी

रमेश मुधोळकर

अनमोल प्रकाशन, पुणे २

प्रकाशक : मा. द. नांदुरकर, अनमोल प्रकाशन ६८३ बुधवार, पेठ, पुणे ४११००२.

मुद्रक : श. हे. गुर्जर, आयुर्विद्या मुद्रणालय, ९९२ सदाशिव पेठ, पुणे

आवृत्ती : १९८६ किंमत : रु. २–५०

३०२८ २४।७।०८
ग्रं.वा.

# गलिव्हरच्या गोष्टी

गलिव्हर नावाचा एक तरुण डॉक्टर होता. तो नॉटिंगहॅममध्ये रहात होता. त्याला प्रवासाची अत्यंत आवड होती. म्हणून त्याने एका जहाजावर डॉक्टरचे काम पत्करले.

या जहाजावरून त्याने बराच काळ प्रवास केला. निरनिराळे देश पाहिले. सुमारे तीन वर्षांनी तो घरी परत आला. त्याला पाहून त्याची बायको व मुले आनंदली. गलिव्हरने ठरविले की, आता प्रवास पुरे. घरीच राहावे आनंदात!

पण त्याची समुद्रप्रवासाची आवड त्याला स्वस्थ बसू देईना. झाले. तो पुन्हा प्रवासाला निघाला. यावेळी तो 'ॲन्टी-

लोप' जहाजावर डॉक्टर म्हणून नोकरीला लागला. प्रवास मजेत चालला होता.

एकाएकी काय झाले! आकाश ढगाळ दिसू लागले. जोराचा वारा वाहू लागला, नि लवकरच वादळ सुरू झाले. जहाजाला वादळाचा तडाखा बसला. नाविकांनी जहाज वाचविण्याची शिकस्त केली. पण वादळ फारच मोठे होते. त्यांचे प्रयत्न कमी पडले. जहाजाची शिडे फाटली. डोलकाठ्या तुटून पडल्या. समुद्राच्या लाटा खूप उंच उसळू लागल्या. जहाजाच्या डेकवर पाण्याचा मारा होऊ लागला, नि जहाजाला भेगा पडून ते तुटले. सर्व नाविक समुद्रात पडले. त्यांच्याबरोबर गलिव्हरही समुद्रात पडला. सागराने भयानक रूप धारण केले.

गलिव्हरला चांगले पोहता येत होते. बरेच तास तो पोहत राहिला. जहाजावरील एकही बरोबरचा प्रवासी दिसत नव्हता.

पोहून पोहून गलिव्हर खूप दमला. आणखी हात मारणे त्याला अशक्य झाले. त्याच्या हातापायांत ताकद उरली नाही. पण इतक्यात त्याच्या पायांना काही तरी भरीव भागाचा स्पर्श झाला. "अरेच्या, ही तर जमीन!" अत्यानंदाने तो ओरडला आणि पोहत किनाऱ्याला लागला. किनाऱ्यावर पाय ठेवल्यावर त्याने सुटकेचा निःश्वास सोडला. पायात त्राण नव्हते तरी आजूबाजूला फिरून कोणी



माणसे, घरे वगैरे दिसतात का, याचा तो शोध घेऊ लागला. पण त्याला तेथे मनुष्य वस्तीच्या खुणा दिसेनात.

शेवटी तो जमिनीवर बसला. दमल्यामुळे तेथेच आडवा होऊन तो गाढ झोपला.

असा तो किती वेळ झोपला होता कोण जाणे? कसल्याशा आवाजाने त्याला जाग आली. पण हे काय? त्याला हातपाय हलविता येईनात. त्याने डोळे उघडले नि आश्चर्याने थक्क झाला. शेकडो छोटी छोटी माणसे त्याच्या आजूबाजूला उभी होती. ती इतकी छोटी होती की, त्यांच्यापैकी एकही जण सहा इंचांपेक्षा उंच नसावा. त्यांनी गलिव्हरच्या हातापायाला दोरे बांधले होते. केसांनाही बांधले होते. सर्व दोरे लोखंडी खुंट्यांना बांधून जमिनीत ठोकले होते. आश्चर्य

म्हणजे त्याच्या छातीवर व पोटावरही ती छोटी माणसे चढली होती. काहीजणांच्या हातात धनुष्यबाण होते. एकटक गलिव्हरकडे बघत होते.

हे सर्व पाहून गलिव्हरला मोठे आश्चर्य वाटले. त्याने दोरे तोडून उजवा हात सोडविला. त्याबरोबर धनुष्यातून सुटलेले असंख्य बाण त्याच्या हातात घुसले त्यामुळे त्याला असे वाटले की, हाताला जणू असंख्य डास चावले आहेत. कारण सहा इंच उंचीची माणसे ती केवढी, त्यांची धनुष्ये केवढी नी बाण तर अगदीच छोटे.

पण हे पाहून त्याने ठरविले की आता हालचाल करण्यात काही अर्थ नाही. पाहूया तर ही छोटी माणसे आता काय करतात. ही बरीच धीट दिसतात हं!

इतक्यात त्यांचा सेनाप्रमुख तेथे आला. तो गलिव्हरशी विचित्र भाषेत बोलू लागला. गलिव्हरला काही त्याची ती भाषा समजेना.

पण लवकरच त्याचे बोलणे संपले. त्याने खूण केली. त्याबरोबर हातात खाण्याच्या पदार्थांनी भरलेली भांडी घेऊन काही छोटी माणसे गलिव्हरसमोर येऊन उभी राहिली. सेनाप्रमुख ते अन्न खाण्याची खुणेने गलिव्हरला विनंती करू लागला. पदार्थ खाता यावे म्हणून गलिव्हरचे हात व डोके त्यांनी मोकळे केले. त्याला तर फार भूक लागली होती. त्याने भराभर एकामागोमाग एका भांड्यातले पदार्थ फस्त केले.

'अबब ! काय याचे खाणे !' असे आपापसात कुजबुजत सर्वजण गलिव्हर-कडे बघत होते. नंतर सेनाप्रमुखाच्या आज्ञेवरून पाचशे सुतार हत्यारासह तयार राहिले. त्यांनी एक सपाट पण चाके असलेली भली मोठी गाडी झटपट बनविली नंतर नऊशे शक्तिवान छोट्या

माणसांनी गलिव्हरला उचलून गाडीवर ठेवले. ती गाडी ओढायला सुरुवात केली. ही प्रचंड मिरवणूक एका पडक्या देवळाकडे निघाली. देवळाजवळ थांबली. मग त्यांनी गलिव्हरला त्या देवळाच्या भिंतीला जखडून ठेवले.

खरे म्हणजे गलिव्हर सहज बंधनातून मुक्त होऊ शकत होता. नुसता मनात यायचा अवकाश. फक्त बोटांचा दाब देऊन तो एखाद्या छोट्या माणसाला सहज चिरडू शकला असता. पण त्याने तसे केले नाही. पाहू या तर ही छोटी माणसे आपल्याला कशा प्रकारे वागणूक देतात! तो स्वस्थ राहिला. त्याने त्यांना जराही इजा केली नाही. कारण मग त्याच्यावरचा त्यांचा विश्वास उडाला असता. ते त्याला शत्रू समजले असते. गलिव्हरला त्यांच्याशी मैत्री करायची होती.

प्रचंड शरिराचा एक माणूस किनाऱ्यावर सापडला आहे ही बातमी एव्हाना त्यांच्या देशातील कानाकोपऱ्यात जाऊन पोचली. ठिकठिकाणाहून छोट्या माणसांच्या झुंडीच्या झुंडी गलिव्हरला पहाण्यासाठी येऊ लागल्या.

गलिव्हर हुशार होता. या वेळपर्यंत त्याने छोट्या माणसांची भाषा लक्षपूर्वक ऐकली. ती त्याला थोडीफार समजूही लागली. त्याला कळले की या देशाचे नाव 'लिलिपुट.'

लिलिपुटमधील छोट्या लोकांनाही गलिव्हर त्यांचा शत्रू नाही याबद्दल खात्री झाली. त्यांनी गलिव्हरला बंधनातून मुक्त केले. ते त्याच्याशी प्रेमाने व आदराने वागू लागले. गलिव्हर त्यांच्याबरोबर मिळून मिसळून राहू लागला.



अचानक एके दिवशी तुताऱ्यांचा आवाज येऊ लागला. राजा त्याच्या कुटुंबियांसह गलिव्हरच्या भेटीला येत होता. इतर सर्वांपेक्षा राजाची उंची किंचित जास्त होती. त्याने सोन्याचा रत्नखचित शिरपेच पागोट्यावर खोवला होता. तो डौलदार पांढऱ्या घोड्यावर स्वार झाला होता.

राजा गलिव्हरला भेटला. त्याने आपल्या सहाशे सेवकांना गलिव्हरची

चाकरी करण्यास सांगितले. त्याला झोपण्यासाठी एक पलंग बनविण्याची राजाने सुतारांना आज्ञा केली.

सुतारांनी गलिव्हरचे माप घेतले. आपापसात विचारविनिमय करून त्यांनी ठरविले की गलिव्हरला लिलिपुटमधील पलंगापेक्षा सहाशेपट मोठा असा पलंग बनविणे खरे म्हणजे त्यांच्या आवाक्याबाहेरचे काम. पण लिलिपुटमधील सुतार भलते हुशार. त्यांनी लवकरच गलिव्हर-साठी सुंदर पलंग बनविला.

गलिव्हरही त्या छोट्या माणसांशी फार प्रेमाने वागे. तो त्यांचा मित्रच बनला. अधूनमधून तो एकेका लिलिपुट रहिवाशाला उचलून घेई. उंचावरून त्यांना लिलिपुट दाखवी. उंचावरून त्यांना ते फारच सुंदर दिसे. आपल्या तळहातावर एकेकाला उभे करून गलिव्हर त्याच्याशी



गप्पागोष्टी करी. आता त्याला त्यांची भाषा बोलता येऊ लागली. त्याचे पाय ही जणू भव्य कमान असे समजून लिलिपुटचे सैन्य त्या कमानीतून पलीकडे जाई.

लिलिपुटमधील लहान मुले त्याला जमिनीवर झोपायला सांगत नि त्याच्या केसांमध्ये लपाछपीचा खेळ खेळत. असे दिवस मजेत चालले होते. त्याच्याविषयी प्रथमदर्शनी वाटणारी भीती आता त्यांना

वाटेनाशी झाली. या भीमकाय राक्षसाला ते आपला मित्र समजू लागले.

लिलिपुटचा राजा एके दिवशी गलिव्हरच्या भेटीला आला. तो म्हणाला, " आम्हाला आपली मदत मिळेल का ? शेजारचा ब्लेफुस्कु देश नेहमी आमच्याशी युद्ध करतो. आताही युद्धाचा इशारा येऊन पोचला आहे. आम्हाला युद्ध नको आहे. त्यांच्याशी मैत्रीचा करार करायचाय. पण एक गोष्ट आहे हं ! आमचे वर्चस्व सिद्ध होऊन त्यांना धाक वाटला पाहिजे. इतका की फिरून कधी युद्धाची भाषा त्यांनी करता कामा नये. यासाठी आम्ही काय करावे बरे ? "

गलिव्हरला राजाचे बोलणे समजले. ब्लेफुस्कु देश म्हणजे एक बेट होते. लिलिपुटच्या किनाऱ्यापासून ते दोन हजार फूट दूर होते. हे सर्व नकाशावर पाहून गलिव्हरला एक युक्ति सुचली.

तो म्हणाला, " असे केले तर.... मी काय करतो .... असा जातो पाण्यातून. नि त्यांची सर्वच्या सर्व जहाजे खेचून एका दमात इकडे घेऊन येतो. त्यामुळे घाबरून ब्लेफुस्कूचा राजा आपल्याला शरण येईल....कशी काय वाटते कल्पना?"

ही कल्पना लिलिपुटच्या राजाला एकदम पसंत पडली. मग गलिव्हरने मोठमोठे दोरखंड मागविले. लोखंडी तारा मागविल्या. तारांना पीळ देऊन त्यांचे त्याने गळ तयार केले. प्रत्येक दोरखंडाला एकेक गळ अडकावला.

दोरखंड घेऊन गलिव्हर पाण्यातून चालत ब्लेफुस्कूच्या दिशेने निघाला. त्याला निरोप देण्यासाठी व शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी लिलिपुटचे रहिवासी किनाऱ्यावर जमले होते. गलिव्हर काही अंतर पाण्यातून चालत गेला. पुढे पाण्याची

खोली थोडी वाढली. मग तो थोडा वेळ पोहत निघाला. नंतर पुढे उथळ पाणी लागले. म्हणून पुन्हा चालत निघाला. ब्लेफुस्कूच्या माणसांना जेव्हा गलिव्हर दिसला तेव्हा त्यांची भीतीने बोबडी वळली. घाबरून ते लपून बसले. ब्लेफुस्कूतील माणसेही लिलिपुटप्रमाणेच पाच-सहा इंच उंचीची होती. जहाजातील खलाशीही घाबरले. मात्र लपून न बसता त्यांनी गलिव्हरच्या दिशेने असंख्य बाण सोडले. अर्थात त्यामुळे गलिव्हरला फारसे काही लागले नाही.

त्याने झटपट एकेका जहाजात एकेक हूक अडकविला नि तोंड फिरवून लिलिपुटच्या दिशेने सर्वच्या सर्व पन्नास जहाजे ओढत नेऊ लागला.

इकडे लिलिपुटचे रहिवासी उत्सुकतेने गलिव्हरची वाट बघत उभेच होते. मध्ये



पाणी जरा खोल होते म्हणून गालिव्हर पोहत निघाला. इकडे लिलिपुटच्या किनाऱ्यावरील लोक घाबरले. ‘ अरेच्चा, हा एकाएकी कसा दिसनासा झाला !’ पण काही मिनिटातच तो पुन्हा दिसू लागला नि दोरखंडाला बांधलेली सर्व जहाजेही त्यांना दिसू लागली. ते अत्यानंदाने ओरडत टाळ्या वाजवू लागले. त्यांनी गालिव्हरचे भव्य स्वागत केले. लिलिपुटचा राजाही खूष झाला. त्याने गालिव्हरचा

सन्मान केला. त्याला भेटवस्तू दिल्या. त्याचबरोबर त्याला राज्यात मुक्त संचार करण्याची परवानगी दिली.

सर्व जहाजे गलिव्हरने पळवून आणल्यामुळे ब्लेफुस्कूच्या राजाने तह मान्य केला. पुन्हा कधी युद्ध करणार नाही, असे वचन दिले. सर्वजण आनंदाने राहू लागले. गलिव्हरने लिलिपुटमधील ' राणीची बाग ' पाहिली. तेथील सर्वांत उंच झाड सात फूट उंचीचे होते. गलिव्हरने तेथील लेखनकलेचा अभ्यास केला. त्याला दिसून आले की लिलिपुटचे रहिवासी पानाच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत तिरकस समांतर रेषांत लिहितात.

असे दिवस चालले होते. पण आता गलिव्हरला घरची आठवण येऊ लागली. त्याला किनाऱ्यावर एक छोटीशी मोडकी होडी दिसली. ती बहुधा एखाद्या जहाजाच्या

डेकवरून धोक्याच्या वेळी पाण्यात सोड-लेली असावी. लिलिपुटमधील सुतारांच्या मदतीने त्याने ती मोडकी होडी दुरुस्त केली. त्यामध्ये काही डबाबंद अन्नपदार्थ व पिण्याचे पाणी ठेवले. सर्वांना रामराम करून तो त्या होडीत बसला नि निघाला. त्या छोट्या लोकांना सोडून जाताना गलिव्हरला दुःख झाले. पण नॉटिंगहॅम-मधील बायको, मुले व मित्र यांच्या तीव्र आठवणीने गलिव्हर बेचैन झाला होता.

आता त्याचे दैव अनुकूल होते. काही दिवस या छोट्या होडीतून प्रवास केल्या-नंतर त्याला एक मोठे जहाज दिसले. ते लंडनच्या दिशेने जात होते. गलिव्हरने जहाजाला इशारा केला. नाविकांना समजले. त्यांनी त्याला जहाजावर घेतले. प्रवासात गलिव्हरने जहाजाच्या कप्तानाला व इतर नाविकांना लिलिपुटमधील गमती-जमती

सांगितल्या. तेथील राजाने दिलेल्या भेटी दाखविल्या. तरीपण कोणाचाच यावर विश्वास बसला नाही.

आता गलिव्हर इंग्लंडच्या किनाऱ्यावर पोचला. तेथून तो आपल्या कुटुंबियांच्या भेटीला निघाला. बायको, मुले व त्याचे मित्र या सर्वांना त्याने लिलिपुटमधील गमती सांगितल्या. त्या ऐकून व तेथील राजाने दिलेल्या छोट्या छोट्या भेटी पाहून त्यांची खूप करमणूक झाली.

पुन्हा लवकरच गलिव्हर प्रवासाला निघाला. यावेळी तो 'ॲडव्हेंचर' जहाजावरून प्रवास करीत होता.

या प्रवासात दुर्दैव उभे राहिले. 'ॲडव्हेंचर' जहाज वादळात सापडले. कप्तानाला जवळच जमीन दिसली. त्याने कसेबसे जहाज त्या किनाऱ्याजवळ उभे केले. सर्वजण किनाऱ्यावर उतरले. इकडेतिकडे

फिरू लागले. गलिव्हरही उतरला. तो एकटाच भटकत किनाऱ्यापासून थोडा दूर गेला. इतक्यात त्याला बरेचजण भिऊन आरडाओरडा करीत असल्याचा आवाज ऐकू आला. त्याने मागे वळून पाहिले. त्याला दिसले की अंदाजे साठ फूट उंचीचा एक भव्य माणूस जहाजाच्या दिशेने येत आहे. आणि त्याला बघून भिऊन सर्वजण जहाजावर चढत आहेत झटपट. गलिव्हर जहाजापासून बराच दूर होता. जहाजाकडे धावत जाण्याऐवजी तो जवळच्या शेतात लपला.

इकडे सर्वजण जहाजावर चढताच कप्तानाने जहाज सुरू केले. गलिव्हर मात्र शेतातच राहिला. तो लपत लपत पुढे जात होता. त्या शेतातील रोपे सुमारे चाळीस फूट उंचीची होती. त्यांना कणसे लागली होती. लवकरच त्याला एक मोठा

रस्ता दिसला. रस्त्याच्या बाजूने मघाच्या माणसासारखीच काही भव्य माणसे त्याला दिसली. ती हातात विळा घेऊन शेताची कापणी करीत होती.

त्यातील एकजण आता अगदी गलिव्हरच्या जवळ आला. आता आपण त्याच्या पायाखाली चिरडू. नाहीतर त्याच्या विळ्याने कापले तरी जाऊ, म्हणून घाबरून गलिव्हर बेंबीच्या देठापासून जोर करून ओरडला. आवाज ऐकताच हातात विळा घेतलेल्या त्या शेतकऱ्याचे गलिव्हरकडे लक्ष गेले. त्याने वाकून गलिव्हरला चिमटीत पकडले नि अलगद वर उचलले. "अरे, किती छोटा हा माणूस!" तो आश्चर्याने उदगारला.

त्याने वर उचलल्यावर गलिव्हरला मात्र भोवळ आल्यासारखे झाले. कारण यावेळी तो जमिनीपासून साठ फूट उंची-

वर होता. शेतकऱ्याने गलिव्हरला अलगद



खिशात ठेवले. शेताची कापणी झाली. तो गलिव्हरला घरी घेऊन आला. त्याने त्याला टेबलावर ठेवले. मुरंबा लावलेली पावाची स्लाइस व साखरेचे भांडे यांच्यामध्ये त्याने गलिव्हरला उभे केले त्याची नऊ वर्षांची मुलगी जवळच खुर्चीवर बसली होती. तिने पाहिले. तिला गलिव्हर जिवंत बाहुलाच वाटला. ती वडिलांना म्हणाली,



“ बाबा, किती छान आहे हा बाहुला ! कुठे सापडला हा ! हा मला देता ? याला खायला प्यायला घालीन मी. याची नीट काळजी घेईन. ”

त्या मुलीने गलिव्हरला खायला प्यायला दिले. रात्री आपल्या बिछान्या-वर झोपविले. त्याला आपला हातरुमाल पांघरला. ज्या खोलीत गलिव्हर झोपला

होता ती अंदाजे दोनशे पन्नास फूट रुंद असावी.

थोड्याच दिवसांत गलिव्हर त्या मुली-कडून त्यांची भाषा शिकला. तो हुशार होता. त्याला समजले की या देशाचे नाव 'ब्रॉबडिंगनॅग.' ती मुलगी त्याला 'टिंगू गलिव्हर' असे म्हणे. तिचे नाव 'ग्लूमा' होते. लवकरच त्या दोघांची मैत्री झाली. जिथे जिथे ग्लूमा जाई तिथे तिथे गलि-व्हरला घेऊन जाई. त्याची खूप काळजी घेई.

त्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील सर्वांना एके दिवशी बाजाराला जायचे होते. त्यांनी गलिव्हरला पण बरोबर घेतले. बाजारात आल्यावर त्याला एका चौथऱ्यावर उभे केले. ब्रॉबडिंगनॅगचे रहिवासी कुतुहलाने त्याच्याकडे पाहू लागले. गलिव्हरविषयीचे कुतुहल पाहून त्या शेतकऱ्याच्या डोक्यात

एक कल्पना चमकली. 'आपण लोकांकडून पैसे का वसूल करू नये गलिव्हरला बघितल्याबद्दल!' झाले! त्याने आपल्या हातातून गलिव्हरला सबंध बाजारात फिरविले. पण त्याला पाहणाऱ्या प्रत्येक माणसाकडून त्याने पैसे वसूल केले. अशा रीतीने त्याने खूप पैसे जमविले.

पण यामुळे गलिव्हर आजारी पडला. ग्लूमाला काळजी वाटू लागली त्याची. गलिव्हरविषयीची बातमी राजाला कळली. त्याने निरोप पाठविला की, 'गलिव्हरला विकत घेण्याची राणीची इच्छा आहे.' स्वतः राजाने पाठविलेला निरोप व राणीची इच्छा, यांचा मान राखायला हवा म्हणून शेतकऱ्याने संमती दिली.

राणी प्रेमळ होती. तिने गलिव्हरला त्याची पहिली इच्छा काय आहे असे विचारले. तो म्हणाला, "ग्लूमाला पण

येथे माझ्याबरोबर राहाण्याची परवानगी असावी."

राणीने परवानगी दिली. मग ग्लमा गालिव्हरच्या सोबतीला राहिली. ती त्याला क्षणभरही विसंबत नसे. त्याचे सर्व ती मनापासून करी. लवकरच त्याला बरे वाटू लागले.

पण एके दिवशी काय झाले! ग्लमा एकटीच मैत्रिणीला भेटायला गेली. गलिव्हर ज्या खोलीत होता त्या खोलीची खिडकी उघडी राहिली होती. त्यातून एका माकडाने खोलीत उडी मारली. या माकडाला राजाच्या स्वयंपाक्याने पाळले होते. खोलीत आल्याबरोबर माकडाने इकडेतिकडे थोडी उचकाउचकी केली. इतक्यात त्याला दिसला गलिव्हर. त्याने गालिव्हरला हातात पकडले. हळूच त्याच्या गालावर चापट मारली.

इतक्यात मैत्रिणीकडे गेलेली ग्लुमा परत आली. तिने हे भयंकर दृष्य पाहिले. ती जोरजोराने ओरडू लागली. त्यामुळे माकड घाबरले. त्याने गलिव्हरसकट



खिडकीतून बाहेर उडी मारली. ते राज-वाड्याच्या छपरावर जाऊन बसले. ही कसली गडबड! राजा स्वतः खिडकीत आला. त्याने पाहिले. प्रसंग ओळखून छपराला उंच शिडी लावण्याची आज्ञा

केली सेवकांना. शिडीवरून पटापट वर चढून प्रधानाच्या तरुण मुलाने गलिव्हरला माकडाच्या हातातून अलगद सोडविले.

झाल्या प्रकाराने गलिव्हर पुन्हा आजारी पडला. पण योग्य काळजी घेतल्यामुळे लवकरच त्याची तब्येत सुधारली. तसेच कोणाशी गप्पा मारण्याइतकी त्यांची भाषाही गलिव्हरला येऊ लागली.

मग त्याने राजाला इंग्लंडविषयी माहिती सांगितली. तसेच नकाशे तयार करण्याची आधुनिक पद्धतही त्याने राजाला सांगितली. राजाच्या मंत्रिमंडळातील लोकांच्या आश्चर्याला पारावर राहिला नाही. 'किती हुशार हा एवढासा टिंगू !' ते आपापसात म्हणू लागले.

एकदा राजा व राणीला दूरच्या शहरी प्रवासाला जायचे होते. त्यानी गलिव्हर व

ग्लुमालाही न्यायचे ठरविले. हे शहर गलिव्हरच्या मोजमापांच्या प्रमाणात अठरा मैल दूर होते. प्रवास सुरू झाला. या प्रवासात गलिव्हरला तीव्रतेने घरची आठवण येत होती. त्याने ग्लुमाला हे सांगितले.

तिला मनातून गलिव्हरच्या वियोगाचे दुःख वाटले. तरीपण तिने त्याला मदत करण्याचे ठरविले.

ती हळूच गलिव्हरला घेऊन आपल्या घरी गेली. तिच्या वडिलांनी सुताराला गलिव्हरसाठी एक छोटी होडी बनविण्यास सांगितले. सुताराने केली छानशी होडी तयार. शेतकऱ्याचा, त्याच्या बायकोचा व ग्लुमाचा निरोप घेऊन गलिव्हर होडीत बसला.

आता इंग्लंडकडे जाणारे एखादे जहाज दिसते का—याचा गलिव्हर चौकस नजरेने शोध घेऊ लागला. आता त्याचे नशिब

जोरावर होते म्हणायचे. कारण आता त्याला हवे असलेले जहाज दिसले. आणि आश्चर्य म्हणजे हे तेच 'ॲडव्हेंचर' जहाज होते, ज्यातून पूर्वी गलिव्हर प्रवासास निघाला होता.

जहाज जवळ येताच गलिव्हरने इशारा केला. कॅप्टनने त्याला वर खेचून घेतले. गलिव्हरने कॅप्टनला 'ब्रॉबडिंगनॅग'मधील भव्य माणसांबद्दल सांगितले.

कॅप्टनचा खरे म्हणजे विश्वास बसत नव्हता. पण गलिव्हरने त्याला समोरच्या किनाऱ्यावर उभे असलेले शेतकरी कुटुंब दाखविले. ते सर्वजण हात हलवून गलिव्हरला निरोप देत होते. ते पाहून कॅप्टनला आठवले—की अरे! आपल्या जहाजावरील नाविक अशाच एका भीमकाय माणसाला पाहून घाबरले होते.

गलिव्हरने कॅप्टनला एक प्रचंड दात दाखविला. हा दात राणीच्या नोकरांपैकी एकाचा असून त्याची लांबी एक फूट व रुंदी चार इंच होती.

आता गलिव्हर नॉटिंगहॅममधील आपल्या घरी आला. आता मात्र त्याने पुन्हा कधी प्रवासास न जाण्याची प्रतिज्ञा केली. पण काय सांगावे. पाहू या आता तो पुन्हा कधी प्रवासास निघतो ते.


बाल वाङ्मय विभाग
क्र. ३०२० दिनांक २४/७/०१८
विषय बा.वा. क्र.....

BVBK-0403020

गलिव्हरने कॅप्टनला एक प्रचंड दात दाखविला. हा दात राणीच्या नोकरांपैकी एकाचा असून त्याची लांबी एक फूट व रुंदी चार इंच होती.

आता गलिव्हर नॉटिंगहॅममधील आपल्या घरी आला. आता मात्र त्याने पुन्हा कधी प्रवासास न जाण्याची प्रतिज्ञा केली. पण काय सांगावे. पाहू या आता तो पुन्हा कधी प्रवासास निघतो ते.

३०२०
बी.वा.

BVBK-0403020